राज्य शासनाच्या मोफत शिक्षण व
लेखन साहित्य वाटप योजनेतंर्गत
निधी वितरण (सन २०१९-२०)

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएसए-२०१९/प्र.क्र.७६/एस.डी.३

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक: ०४ जून, २०१९

वाचा:-

१. वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.०१/०४/२०१९.
२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. एसएसए-१२१४/प्र.क्र.५०/एस.डी.३, दि. २५/०२/२०१४.
३. नियोजन विभाग, शासन निर्णय डिसीटी-२३१८/प्र.क्र.७२/का.१४१७, दि. ४ जून, २०१९.

शासन निर्णय :-

राज्य शासनाच्या "**१०३ विकास गटाकरिता**" इ. १ ली ते ४ थी च्या अनुसूचित जाती / जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता मोफत गणवेश व लेखनसाहित्य वाटप योजनेतंर्गत खालीलप्रमाणे रु. ११३.३३ लक्ष (रुपये एकशे तेरा लक्ष तेहतीस हजार फक्त) निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ. क्र.	लेखाशिर्ष	अर्थसंकल्पित तरतूद	वितरित करण्यात येत असलेला निधी
१.	मागणी क्रमांक ई-२, २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०१-प्राथमिक शिक्षण, (०१) (०४), जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील अनुसुचित जातीच्या / जमतीच्या विद्यार्थ्यांना विशेष सुविधा (२२०२ ३६५५) ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)"	रू.१८०.०० लक्ष	रु.६०.०० लक्ष
२.	मागणी क्रमांक ई-२, २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०१-प्राथमिक शिक्षण, (०१) (०५), १०३ विकास गटांमधील इ. १ ली ते ४ थी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत गणवेश व लेखन साहित्यासाठी जिल्हा परिषदांना अनुदाने (२२०२ ३६६४) ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)"	रू.१६०.०० लक्ष	रु. ५३.३३ लक्ष
	एकूण :-	**रु. ३४०.०० लक्ष**	**रु. ११३.३३ लक्ष**

२. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि. ०१/०४/२०१९ च्या परिपत्रकास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे. सदर परिपत्रकातील परिच्छेद ५ ते १७ मधील अटींची तसेच, परिपत्रकाच्या परिशिष्टातील अनुक्रमांक १२ व १३ मधील नमूद अटींची पूर्तता होत आहे. सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील मुद्दा क्र.५ ते ११ मधील बाबी या आदेशासाठी लागू नाहीत.

३. सदर खर्च वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि. ०१/०४/२०१९ च्या परिपत्रकातील सूचनांनुसार करण्यात यावा. यासाठी शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आंहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. मोफत गणवेशाकरिता उपरोक्त निधी पुरेसा नसेल तर जिल्हा परिषदांना त्यांच्या अधिनस्त असलेल्या निधीतून निधी उपलब्ध करुन देणे शक्य असल्यास या योजनेकरिता आवश्यक अधिकचा निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. समग्र शिक्षा अभियानांतर्गत प्राथमिक स्तरावर २ गणवेशाकरिता रु. ६००/- इतके अनुदान मिळते तर १०३ विकास गटांमध्ये मोफत गणवेशाची योजना ही पूर्वीपासून सुरु असल्याने या अंतर्गत गणवेशाची रक्कम रु. ५७ (मुलांकरिता), रु ६९ (मुलींकरिता) आहे. तथापि, ही रक्कम कमी असल्याने १०३ विकास गटांमधील शाळांतील विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे तसेच, पुरेसे गणवेश मिळण्यास अडचणी निर्माण होतात. यामुळे १०३ विकास गटांशी संबंधित जिल्हा परिषदांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या निधीतून गणवेशाकरिता आवश्यक निधी उपलब्ध केल्यास या अडचणी सोडविता येतील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६०४१६०६१५३७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRAMOD ABAJI PATIL

Digitally signed by PRAMOD ABAJI PATIL
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=4a3b99d57d257e955ed34ca51db1f3c521002555e05c455e86fa1c9c82a1d82b, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=68d5a8abffdd75cba24301aa39c12b40983f304d7267796a32b42d4d558f1a1f, ou=SCHOOL EDUCATION , o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=PRAMOD ABAJI PATIL
Date: 2019.06.04 16:13:27 +05'30'

(प्रमोद पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई
६. सर्व मा. संसद सदस्य/ विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
८. मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई

९. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नीरोड, मुंबई
१०. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
११. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र ½, मुंबई/नागपूर.
१४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१५. शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद (सर्व)
१६. वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई
१७. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई
१८. निवड नस्ती - एस.डी.३